# प्रकरण 2 (पुस्तिका – 1)

## उप प्रमुख अभियंता (पापुप्र) बांधकामे-1

संस्थेची संरचना, कामे व कर्तव्याबाबतचा तपशील

**2.1 लोकप्राधिकरणाची उद्दिष्टे व हेतू :-**

नवीन जलस्त्रोताबाबतची कामे, नवीन जलवाहिन्या टाकणे, त्याकरिता बोगदे, भूयारे इ.ची बांधणी सेवाजलाशयासह अधिकाधीक पाणी आणून त्याच्या समान वितरणाकरिता टाकण्यात येणा-या जलवाहिन्या, नवीन उदंचन केंद्रे, जलप्रक्रिया केंद्रे, जलशुद्धिकरण प्रक्रिया केंद्रे इ.च्या बांधणी, पुनर्बांधणीच्या तसेच त्यासंबंधीत सर्व कामांसाठी आवश्यक असणारे नियोजन व बांधणी उभारणी करणे.

**2.2 विशेष कार्य / कल्पना (नियोजन) :-**

मुंबई शहराच्या विविध मोठ्या भागांना सर्वोच्च प्रतीच्या पिण्याच्या स्वच्छ पाणी पुरवठ्यात समान प्रमाणात वाटप होण्यासाठी वृद्धी करणे.

**2.3 इतिहास व माहितीचा संदर्भ :-**

मुंबई शहर व उपनगरांचा जसा विस्तार होऊ लागला तसा पाण्याचा अतिरिक्त पुरवठा करण्याकरिता हाती घ्यावयाच्या नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांची गरज भासली. पाण्याचे प्रमुख स्त्रोत हे शेजारील ठाणे जिल्हयामध्ये आहे. त्याचप्रमाणे अशुध्द पाण्याकरीता उदंचन केंद्र आणि एक शुध्दीकरण सयंत्र नगर बाहय विभागात आहे. त्यामुळे प्रकल्पांच्या कामावर प्रभावि नियंत्रण ठेवण्याकरीता एका स्वतंत्र विभागाची आवश्यकता निर्माण झाली व त्यानुसार उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.)बांधकामे-1 हा स्वतंत्र विभाग बाळकुम, ठाणे येथे स्थापन करण्यात आला.

**2.4 कर्तव्ये :-**

पाणी पुरवठयासंबंधी जलवाहिन्या व इतर बांधकामे यांची अनुभवी व प्रशिक्षीत कंत्राटदाराकडून अंमलबजावणी करुन घेणे.

**2.5 मुख्य कामे / कार्य :-**

प्रमाणभूत दर्जाचे पाणीपुरवठा संबंधित विविध प्रकल्प टप्प्या टप्प्याने राबविणे.

**2.6 पुरविण्यात येणा-या सेवांची यादी :-**

सदर विभागाकडून नागरिकांना परस्पर कोणतीही सेवा देण्यात येत नाही. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना सेवा देण्याकरिता जल अभियंता खात्याकडे हस्तांतरित करण्यात येतो.

चालू प्रकल्प कामे - उप प्रमुख अभि(पा.पु.प्र.) बां-१

1. पांजरापूर येथील जलप्रकिया केंद्रामधून उत्सर्जित होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्र बांधण्याबाबतची उर्वरित कामे.
2. भांडुप संकुल येथे महासंतुलन जलाशय क्र.1 (एम बी आर-1) च्या संरचनात्मक दुरुस्ती

2.7 **संरचनात्मक तक्ता :-**

सध्या या खात्याच्या संरचनेनुसार पुस्तिकेमध्ये संरचनात्मक तक्ता जोडण्यात आलेला आहे.

उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.)बां-1 यांच्या अधिपत्याखाली काम करणारा कर्मचारी वर्गाचा संरचनात्मक तक्ता

| पदनाम | पदे |
|---|---|
| उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.)बां-1 | 1 पद (प्रभारी ) |
| कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.)बां-1 | 1 पद |
| सहाय्यक अभियंता (पा.पु.प्र.)बां-1 | 1 पदे |
| दुय्यम अभियंता (पा.पु.प्र.)बां-1 | 1 पद |
| कनिष्ठ अभियंता (पा.पु.प्र.)बां-१ | 2 पद |
| मुख्य लिपिक | 2 रिक्त पदे |
| कनिष्ठ लघुलेखक | 2 रिक्त पदे |
| आरेखक | 1 रिक्त पद |
| लिपिक | 2 रिक्त पदे |
| नाईक | 1 रिक्त पद |
| मुकादम | 1 रिक्त पद |
| शिपाई | 1पद, 1 रिक्त |
| निळप्रत मुद्रक | 1पद, |
| कामगार | 1 रिक्त पद |

2.8 **जनतेकडून अपेक्षा :-**

सदर कामे पार पाडताना होणा-या गैरसोयी सहन करणे.

2.9 **जनतेच्या सहभागाच्या योजना :-**

जल अभियंता खात्यामार्फत जलवाहिन्यांच्या कामाकरीता कराव्या लागणा-या संभाव्य पाणी कपातीची सूचना जाहिरीतीद्वारे प्रसिध्द करण्यात येते.

2.10 **सेवा पुरविण्याची संरचना व जनतेच्या तक्रारी :-**

सदर बाब प्रकल्पकामांबाबत लागू होत नाही.

सही-

**उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) बां-१**